# Shivaji University, Kolhapur
# Shivaraj Lead College Cluster, Gadhinglaj

**Sponsored**

Research Sensitization Scheme for College Students &
Research Promotion Activity for Students of Affiliated Colleges
Under Lead College Scheme

(Minor Research Project)

## Title of the Project

**‘पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजना: एक मुल्यमापनात्मक अभ्यास’**


## Research Students

i) Miss. Tejswini Appasaheb Jondhale (BA III)

ii) Miss. Shruti Shridhar Hodage (BA III)

iii) Ms. Ankita Parasharam Misal (BA III)

## Project Advisor

Asst. Prof. Dharmvir Shahu Kshirsagar,
Department of Political Science,
Arts, Commerce and Science College, Gadhinglaj


## Year 2022-23

# प्रतिज्ञापत्र

आम्ही संशोधक विद्यार्थी प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, **'पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजनाः एक मुल्यमापनात्मक अभ्यास'** या विषयावरील शोध प्रकल्प शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिवराज अग्रणी महाविद्यालय योजना यांच्या अंतर्गत आम्ही पूर्ण केला आहे. हा संशोधन प्रकल्प आम्ही इतर कोणत्याही पदवीसाठी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. या प्रकल्पातील संशोधन व निष्कर्ष हा आमच्या अभ्यासाचा परिपाक आहे. या प्रकल्पातील कोणताही भाग अन्यत्र कोठेही प्रकाशित झालेला नाही.

स्थळ : गडहिंग्लज

दिनांक : 20/06/2023

## –संशोधक विद्यार्थी–

1) तेजस्विनी आप्पासाहेब जोंधळे (बी. ए. भाग 3)
2) श्रुती श्रीधर हाडगे (बी. ए.भाग 3)
3) अंकिता परशराम मिसाळ (बी. ए.भाग 3)

# प्रमाणपत्र

**'पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजनाः एक मुल्यमापनात्मक अभ्यास'** या विषयावरील संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिवराज अग्रणी महाविद्यालय योजना यांच्या अंतर्गत माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. हा संशोधन प्रबंध इतर कोणत्याही पदवीसाठी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. या प्रकल्पातील संशोधन व निष्कर्ष हा संशोधक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा परिपाक आहे. या प्रकल्पातील कोणताही भाग अन्यत्र कोठेही प्रकाशित झालेला नाही. हा संशोधन प्रकल्प विद्यापीठात सादर करण्यास मी अनुमती देत आहे.

गडहिंग्लज.

दि. 20/06/2023

## – प्रोजेक्ट ॲडव्हायझर–


सहा. प्रा. धर्मवीर शाहू क्षीरसागर

राज्यशास्त्र विभाग

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या 'Research Sensitization Scheme for College Students- Research Promotion Activity for Students of Affiliated Colleges Under Lead College Scheme – 2022-23' अंतर्गत **'पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजनाः एक मुल्यमापनात्मक अभ्यास'** या विषयावरील संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिवराज अग्रणी महाविद्यालय योजना यांच्या अंतर्गत पूर्ण केला आहे. हा संशोधन प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. त्यांचे ऋणनिर्देश करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

आमचा प्रस्ताव मान्य करून आम्हास संशोधनाची संधी उपलब्ध करून दिली व अनुदान मंजूर केले, त्याबद्दल सर्वप्रथम आम्ही शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि शिवराज (अग्रणी) महाविद्यालय, गडहिंग्लज यांचे आभार व्यक्त करतो. शिवराज अग्रणी महाविद्यालय, समन्वयक प्रा. एन. बी. एकिले यांनी बहूमोल सहकार्य केले. आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. राजन पेडणेकरसो यांनी आम्हास प्रेरणा दिली व आमच्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांनी या प्रकल्पासाठी आम्हास प्रोत्साहन दिले, त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो. अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक तथा राज्यशास्त्र विभागाचे पोजेक्टर ॲडव्हायझर सहा. प्रा. धर्मवीर शाहू क्षीरसागर यांनी हा प्रकल्प सुरूवातीपासून पूर्ण होईपर्यंत आमच्याकडून आवश्यक ते काम करवून घेतले. त्याचप्रमाणे त्यात वेळोवेळी दुरूस्त्या सूचविल्या व अंतिम अहवाल तयार झाला. त्याबद्दल प्रोजेक्ट ॲडव्हायझर म्हणून त्यांच्या ऋणात राहणे आम्ही पसंत करतो.

या संशोधनासाठी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल डी. पाटील, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख डॉ गंगासागर चोले, श्री. विजय पाटील व इतर सर्व प्राध्यापक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले. आमच्या प्राध्यापकांनी जर आम्हास सक्ती केली नसती तर कदाचित आम्ही या प्रकल्पात सहभागी झालो नसतो. ग्रंथपाल श्री. समिर कुलकर्णी, मुख्य लिपिक श्री. प्रकाश कांबळे, श्री. अमर पोवार, श्री. रणजीत कुंभार, श्री. विजय पाटील व इतर प्रशासकीय कर्मचारी यांचे देखील वेळोवेळी सहकार्य लाभले.

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालय, शिवराज महाविद्यालय ग्रंथालय, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे अधिकारी व कर्मचारी, महाविद्यालयाचे

विद्यार्थी यांचे बहुमोल सहकार्य मिळाले, म्हणून हा प्रोजेक्ट पूर्ण करता आला. या संशोधन प्रकल्पासाठी ऑनलाईन सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाला ज्यांनी प्रतिसाद दिला त्या सर्व उत्तरदात्यांचे आम्ही आभार व्यक्त करतो.

हा संशोधन प्रकल्प टायपिंग करून प्रिटींगचे सुबक काम वेळेत पूर्ण केल्याबद्दल साधना झेरॉक्स यांचे तसेच बायडींगचे काम करण्यारे राहूल झेरॉक्स व टायपिंग सेंटर, गडहिंग्लज यांचे देखील आम्ही आभारी आहोत. याशिवाय वर्गातील अनेक विद्यार्थी मित्रांनी संदर्भ माहिती जमा करताना अनेकदा मदत केली आहे. त्या सर्व ज्ञात अज्ञात विद्यार्थी मित्र व इतरांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो व आपल्या सार्वाच्या चिकीत्सेसाठी हा संषोधन प्रकल्प सादर करतो.

धन्यवाद!

20/06/2023 संशोधक विद्यार्थी

1) तेजस्विनी आप्पासाहेब जोंधळे (बी.ए. भाग 3)
2) श्रुती श्रीधर हाडगे (बी.ए. भाग 3)
3) अंकिता परशराम मिसाळ (बी.ए. भाग 3)

# अणुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | पान |
|---|---|---|
| अ | मुखपृष्ठ | i |
| ब | प्रतिज्ञापत्र | Ii |
| क | प्रमाणपत्र | iii |
| ड | ऋणनिर्देश | iv |
| | अणुक्रमणिका | vi |
| | संक्षिप्त संज्ञा | vii |
| पहिले | प्रस्तावना | viii |
| दुसरे | पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजना | xi |
| तिसरे | लाभधारक व वंचित | xx |
| चौथे | वंचिततेची कारणे व मिमांसा | xxiii |
| पाचवे | निश्कर्ष व उपाययोजना | xxix |
| | संदर्भसूची | xxxii |
| | अनुसूची : 1 सर्वेक्षणासाठी वापरलेली प्रश्नावली | xxxiii |
| | अनुसूची : 2 2020–2021 लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची यादी | xxxiv |
| | अनुसूची : 3 2021–2022 लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची यादी | xxxv |
| | | |

# संक्षिप्त संज्ञा

| | |
|---|---|
| **SC-** | Shedulede Caste |
| **ST-** | Shedulede Tribe |
| **OBC-** | Other Backward Class |
| **VJNT-** | Vimukta Jati Nomedic Tribe |
| **SEBC-** | Socialy and Economicaly Backward Classes |
| **SBC-** | Special Backward Class |
| **DBT-** | Direct to trancfer |
| **DHE-** | Directorate of Higher Education |
| **SJD-** | Social Justice Departmet |
| **EBC-** | Economicaly Backward Class |

# प्रकरण पहिले: प्रस्तावना

भारतीय संविधानाने सामाजिक, राजकीय व आर्थिक न्यायाचे उदिष्ट मान्य केले आहे. समाजातील दुर्बल समाजघटकांच्या उन्नतीसाठी शासन वेळोवेळी विविध योजना तयार करते. विविध आर्थिक साहय योजना राबवते. अशाच शैक्षणिक साहय योजना मागील 75 वर्षात पदवी स्तरातील विद्यार्थ्यांसाठी राबविल्या आहेत. जसे की, मोफत वस्तीगृह योजना, शिष्यवृती योजना, शैक्षणिक शुल्क सवलत योजना, मोफत प्रवास योजना ईत्यादी. या योजना राबविण्यासाठी लाभधारकांची पात्रता निश्चित केली जाते. या पात्रतामध्ये विविध कागदपत्रे आवश्यक असतात. तसेच अर्ज करण्याची विशिष्ट प्रक्रिया स्पष्ट केली जाते.

अशा योजनांच्या स्वरूपात, व्याप्तीत, प्रक्रियेत व पात्रतेत वेळोवेळी बदल होत राहिला. सद्या स्वतः ऑनलाईन अर्ज करणे व डायरेक्ट टू बेनिफीट (Direct to Benefite) या पध्दतीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पध्दतींच्या बदलानूसार लाभधारक व वंचिततेच्या संखेत फरक पडत जातो. माहिती तंत्रज्ञान व कागदपत्रातील चोखपणा यामुळे रास्त लाभधारकापर्यंत पोहचणे शक्य झाले असले तरी अत्याधिक तांत्रिकता व कागदपत्रातील काटेखोरपणा, सख्तपणा हा अधिक खर्चिक, कष्टप्रद, भ्रष्टाचारास वाव देणारा ठरतो. परीणामी लाभप्रक्रियेतील सुलभता कमी होते. आजारापेक्षा उपाय भयंकर होवून बसतो. यातून लाभ घेण्याकडील कल कमी होतो. त्यामुळे संविधानाचा व शासनाचा जन कल्याणाचा हेतू सफल होत नाही. या सर्व बाबींचा विचार करून पदवी स्तरातील विविध शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांच्या यशापयशांचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन कार्य केले आहे. योजनांचे स्वरूप, पात्रता व प्रक्रियेतील त्रुटी व समस्या शोधून त्या दूर करण्याच्या दृष्टिने प्रस्तून प्रकल्पातून उपाय सुचविले आहेत.

**समस्या व महत्व:**

सामाजिक न्याय तत्वानुसार शासनाकडून पदवी स्तरावर विविध शिष्यवृत्त्या व शिक्षण सवलत योजना राबविल्या जातात. शासनाकडून, विद्यापिठाकडून व महाविद्यालयांकडून वारंवार सुचना करूनही अनेक पात्र विद्यार्थी देखील या योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य करून उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा शासनाचा हेतू सफल होण्यात अडथळा निर्माण होत आहे. शिवाय शैक्षणिक खर्च न पेलल्यामुळे शिक्षण सोडून देण्याचे प्रकार वाढत जातात. अर्धवट शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न तयार होतो. एकूणच दुर्बल घटकांच्या क्षमता विकासाचा हेतू सफल होत नाही. ही समस्या विचारात घेवून प्रस्तूत संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे.

विविध योजनांचा लाभ पात्र विद्यार्थी का घेत नाहीत? याच्या कारणांचा शोध प्रस्तूत संशोधनात घेतला आहे. ही कारणे स्पष्ट करून पात्र विद़्यार्थ्याना लाभ मिळण्यास येणारे अडथळे दूर करण्यास उपाय

सुचविल्यामुळे लाभधारकांच्या संख्येत वाढ होण्यास या संशोधन कार्यामुळे साहय होईल. सामाजिक न्यायाच्या प्रभावी अंमलबजावणी करता येईल. आर्थिक लाभापासून वंचित राहून शिक्षणातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होण्यास चालना मिळेल.

**गृहितकेः**

1. शासनाने पदवी स्तरावर विविध समाजघटकांना सामावुन घेणाऱ्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क योजना सुरू केल्या आहेत.
2. योजनांच्या लाभधारकांच्या तुलनेत वंचित राहणाऱ्याची संख्या अधिक आहे.
3. वंचित राहण्यामागे कागदपत्रांची अधिकता, अनुल्पब्धता, खर्च, एकसुत्रतेचा अभाव ही कारणे आहेत.
4. योजनाचा लाभ घेण्यासाठी प्रक्रिया, पध्दती व नियमावलीमध्ये आवश्यक बदल करणे आवश्यक आहे.

**उद्देशः**

1. पदवी स्तरीय शासकीय व वि़द्यापिठीय शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा आढावा घेणे.
2. योजनांचे लाभधारक व वंचित यांचा तुलनात्मक आढावा घेणे.
3. योजनांच्या यशापयशांची चर्चा करणे.
4. लाभापासून वंचित राहण्याची कारणे स्पष्ट करणे.
5. योजनांच्या लाभधारकांची व्याप्ती वाढण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दतीः**

प्रस्तूत संशोधनात व्यष्ठी अध्ययनाअंतर्गत कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाची निवड केली आहे. नमुना निवडी अंतर्गत महाविद्यालयाची 2020–21 व 2021–22 या शैक्षणिक वर्षामधील विद्यार्थ्याची माहिती निवडली आहे. सर्वेक्षणासाठी 2021–22 या शैक्षणिक वर्षामधील BA I, II, III व B.com I च्या 128 (31.52%) विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे. प्रश्नावलीसाठी गुगल फॉर्म या ऑनलाईत तंत्राचा वापर केला. या कार्यात तुलनात्मक पध्दतीतर्गंत लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची तुलना केली आहे. मुल्यमापनात्मक पध्दतीतर्गंत योजनांच्या अंमलबजावणीचे यश–अपयशाची मिमांसा केली आहे. प्राथमिक माहितीस्त्रोतंर्गत सर्वेक्षण व प्रश्नावली तंत्राचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून योजनांच्या प्रक्रियेतील त्रूटी, समस्या व अडथळे याविषयी माहिती

संकलित केली आहे. याशिवाय व्दितिय माहितीस्त्रोतार्गत पुस्तके, मासिके, शोधपत्रिका, अहवाल, शासननिर्णय, अनुशांगीक वेबसाईटसचा वापर केला आहे.

**अभ्यासाची व्याप्ती व मर्यादाः**

प्रस्तूत संशोधन प्रकल्पात केवळ पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा अभ्यास केला आहे. या कार्यात केवळ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज यातील 2020–21 व 2021–22 या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांविषयी माहितीचा उपयोग केला आहे. पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजना संपूर्ण राज्य व देशपातळीवर राबविल्या जातात. त्यामुळे या विषयाचे अभ्यासक्षेत्र व्यापक असल्याने संपुर्ण अभ्यास क्षेत्राची संशोधनासाठी निवड करणे वेळ, शक्ती व पैसा दृष्टिने हा कठिण कार्य आहे. ही या विषयाची मर्यादा आहे.

**फलनिष्पत्ती / फायदेः**

1. पदवी स्तरावरील पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांची एकत्रित माहिती उपलब्ध झाली आहे.
2. पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांचे लाभधारक व वंचितांची तुलनात्मक पध्दतीने मांडणी केली आहे.
3. शिष्यवृत्त्यांच्या व शिक्षण शुल्क योजनांच्या वंचिततेची कारणमिमांसा केली आहे.
4. पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांच्या लाभाची व्याप्ती वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविल्या आहेत.

# प्रकरण दुसरेः पदवी स्तरीय शिष्यवृत्त्या व शिक्षण सवलत योजना

**प्रस्तावनाः**

प्रस्तत प्रकरणात केंद्र व राज्य पातळीवर राबविल्या जाणाऱ्या पदवी स्तरावरील शिष्यवृत्या व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

**2. 1. केंद्रशासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती**

**2. 1. 1 सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना किमान पात्रता व अटी –**

1. टॉप 20 पर्सेंटरिल यादीमध्ये नाव समाविष्ट असावे
2. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
3. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसावा
4. वार्षिक उत्पन्न रू. 4.5 लाखापेक्षा जास्त नसावे
5. 75 टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे
6. विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते असावे
7. नुतनीकरणासाठी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक

**आवश्यक कागदपत्रे –**

1. विद्यार्थ्यांचा आयडेंटी साईज फोटो
2. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत
3. पालकांचा वार्षीक उत्पन्नांचा दाखला (तहसीलदार प्रमाणित)
4. डोमेसिअल सर्टिफिकेट (तहसीलदार प्रमाणित)
5. चालू वर्षाची फी पावती
6. आधार संल्गन बॅक खाते कमांक ( बॅक पासबुक)
7. सिस्टीम जनरेटेड बोनाफाईड सर्टिफिकेट
8. आधारसंल्गन मोबाईल नंबर (आधारकार्ड प्रत)

**2. 1. 2. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना**

जैन, मुस्लीम ,ख्रिष्चन, शीख, पारसी व बैध्द या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. केंद्रशासनाकडून या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी 47574 संच निर्धारीत केले आहे. 30 टक्के मुलींसाठी राखीव आहे.

**किमान पात्रता व अटी –**

1. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
2. मागील वार्षिक परीक्षेत किमान 60 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण असावा
3. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसावा
4. वार्षिक उत्पन्न रू. 2.00 लाखापेक्षा जास्त नसावे
5. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना लाभ
6. उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक
7. विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते
8. नुतनीकरणासाठी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक

**आवष्क कागदपत्रे –**

1. विद्यार्थ्यांचा आयडेंटी साईज फोटो
2. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत
3. पालकांचा वार्षिक उत्पन्नांचा दाखला (तहसीलदार प्रमाणित)
4. डोमेसिअल सर्टिफिकेट (तहसीलदार प्रमाणित)
5. चालू वर्षाची फी पावती
6. आधार सल्गन बॅक खाते क्रमांक ( बॅक पासबुक)
7. सिस्टीम जनरेटेड बोनाफाईड सर्टिफिकेट
8. आधारसंल्गन मोबाईल नंबर (आधारकार्ड प्रत)

**2. 1. 3. अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना**

सदरची शिष्यवृत्ती महाराष्ट्र राज्यासाठी नवीन शिष्यवृत्ती 1879 संच निर्धारीत केलेले आहेत.

**किमान पात्रता व अटी –**

1. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावी
2. मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण असावा

3. अपंगत्वाची टक्केवारी 40 टक्के व त्यापुढील असावी

4. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसावा

5. वार्षिक उत्पन्न रू. 2.50 लाखापेक्षा जास्त नसावे

6. एका कुटुंबातील फक्त दोन अपंग अपत्यांना लाभ

7. उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक

8. विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते

**आवश्यक कागदपत्रे –**

1. विद्यार्थ्यांचा आयडेंटी साईज फोटो

2. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत

3. पालकांचा वार्षिक उत्पन्नांचा दाखला (तहसीलदार प्रमाणित)

4. डोमेसिअल सर्टिफिकेट (तहसीलदार प्रमाणित)

5. चालू वर्षाची फी पावती

6. आधार संल्गन बॅक खाते कमांक ( बॅक पासबुक)

7. सिस्टीम जनरेटेट बोनाफाईड सर्टिफिकेट

8. आधारसंल्गन मोबाईल नंबर (आधारकार्ड प्रत)

9. अल्पसंख्याक समुदायाचे स्वयंघोशित प्रमाणपत्र

**2. 2. राज्यशासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती किंवा शिक्षण शुल्क सवलत योजना**

1. राजर्शी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई.बी.सी.)

2. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (आरक्षीत प्रवर्ग)

3. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना

4. एकलव्य आर्थिक सहाय्य

5. गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ व वरिष्ठ)

6. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

7. माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

8. शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

9. शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती

10. जवाहरला नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती

11. गणित व भौतिकषास्त्र विशयातील प्रज्ञावन विद्यार्थ्यांनी देण्यात येणारी षिश्यव

12. राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती

13. राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

14. राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग – 2)

**2. 2. 1. राजर्शी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी)**

**किमान पात्रता व अटी –**

1. महाराष्ट्राचा रहिवासी तसेच महाराष्ट्र–कर्नाटक राज्य सीमेवरील विद्यार्थी अर्ज करू शकतात
2. वार्षिक उत्पन्न रू. 8.00 लाखापेक्षा कमी
3. शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले पात्र ठरतील
4. इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा
5. उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक
6. मागील वषी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला विद्यार्थी नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतो
7. अर्जदार विद्यार्थ्यांस प्रत्येक सत्र अथवा वर्षांची परीक्षा देणे आवश्यक

**आवश्यक कागदपत्रे –**

1. विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन अर्ज
2. 10 वीचे सर्टीफिकेट
3. 12 वीचे मार्कशिट
4. जे विद्यार्थी नुतनीकरणासाठी असतील त्यांचे सेमीस्टर वाईज सगळे मार्कलिस्ट
5. तहसिलदार प्रमाणित उत्पन्न दाखला
6. तहसिलदार प्रमाणित डोमेसिअल प्रमाणपत्र
7. चालू वर्षाची फी पावती
8. आधारकार्ड (बॅक संल्गन)
9. रेशनकार्ड
10. बॅक पासबुक (आधार संलग्न मोबाईन नंबर)
11. प्रतिज्ञापत्र (दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र)
12. 10 वी पासून कोणत्याही वर्षामध्ये गॅप असल्यास गॅप संबंधित दस्तऐवज

13. वडील हयात नसतील तर त्या बद्दलचे मृत्युप्रमाण पत्र

14. विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील उपस्थिती दाखला

15. विद्यार्थ्यांचा आधार बॅक लिंक असलेले स्टेट्ची प्रिंट सोबत जोड

**2. 2. 2. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (आरक्षीत प्रवर्ग)**

पात्र ठरलेले विद्यार्थी हे (SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, OBC, SBC) या आरक्षीत प्रवर्गातील असावे.

**किमान पात्रता व अटी –**

1. महाराष्ट्राचा रहिवासी तसेच महाराष्ट्र–कर्नाटक राज्य सीमेवरील विद्यार्थी अर्ज करू शकतात.
2. शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले पात्र ठरतील
3. इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा
4. उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक
5. मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला विद्यार्थी नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतो
6. अर्जदार विद्यार्थ्यांस प्रत्येक सत्र अथवा वर्षांची परीक्षा देणे आवष्यक

**आवश्यक कागदपत्रे –**

1. विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन अर्ज
2. 10 वीचे सर्टीफिकेट
3. 12 वीचे मार्कशिट
4. जे विद्यार्थी नुतनीकरणासाठी असतील त्यांचे सेमीस्टर वाईज सगळे मार्कलिस्ट
5. तहसिलदार प्रमाणित उत्पन्न दाखला
6. तहसिलदार प्रमाणित डोमेसिअल प्रमाणपत्र
7. विद्यार्थ्यांचे स्वतःच्या नावाचे जातीचा दाखला
8. चालू वर्षीचा बोनाफाईड सर्टिफिकेट
9. चालू वर्षीची फी पावती
10. आधारकार्ड (बॅक संल्गन)
11. रेशनकार्ड
12. बॅक पासबुक (आधार संलग्न मोबाईन नंबर)

13. प्रतिज्ञापत्र (दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र)

14. 10वी पासून कोणत्याही वर्षामध्ये गॅप असल्यास गॅप संबंधित दस्तऐवज

15. शाळा सोडल्याचा दाखल्याची प्राचार्य प्रमाणित सत्यप्रत

16. वडील हयात नसतील तर त्या बद्‌दलचे मृत्युप्रमाण पत्र

17. विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील उपस्थिती दाखला

18. विद्यार्थ्यांचा आधार बॅक लिंक असलेले स्टेट्‌ची प्रिंट सोबत जोडणे

**2. 2. 3. एकलव्य आर्थिक सहाय्य योजना**

योजनेच्या प्रमुख अटीः

1. कला,वाणिज्य, विधी व शिक्षणाशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 60 टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 70 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

2. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्शिक उत्पन्न रू. 75000/– किंवा त्यापेक्षा कमी असावे.

**2. 2. 4. गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना** (कनिष्ठ व वरिष्ठ स्तर)

योजनेच्या प्रमुख अटी :

1. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.

2. तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

आवश्यक कागदपत्रे :

1. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती

2. संचालनालयामार्फत पाठविण्यात आलेले शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र

**2. 2. 5. राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती**

योजनेच्या प्रमुख अटी :

1. इयत्ता बारावी मध्ये किमान 60 टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

2. कला ,वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

3. अधिवास प्रमाणपत्र, मागील वर्षाची गुणपत्रिका, बोनाफाईड सर्टिफिकेट ही आवश्यक कागदपत्रे

4. सदर योजनेसाठी लाभाचे स्वरूप प्रतिमाह रू.100 याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रू.1000/– शिष्यवृत्ती देण्यात येते.

**2. 2. 6. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य**

योजनेच्या प्रमुख अटी :

1. अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य असणे आवश्यक आहे.

2. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना म्हणजेच स्वातंत्र्य सैनिकांचे पत्नी, मुले (दत्तक आणि सावत्र) आणि नातवंड (मृत्यु पावलेल्या मुलांची मुले) या योजनेसाठी अर्ज करू शकतात.

3. सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.

2. 2. 7. **माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य**

योजनेच्या प्रमुख अटी :

– महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणा–या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर, नौदल वा वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत सेवेतुन निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना, पत्नींना/विधवांना या योजनेखाली शैक्षणिक सवलती देय आहेत.

– या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेखाली फी माफी, पुस्तक अनुदान इ. सवलतींचा लाभ या सवलती बरोबर घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्यांला एका पेक्षा जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही, केवळ अनुदानित महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे विद्यार्थी पात्र.

2. 2. 8. **राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती**

योजनेच्या प्रमुख अटी :

1. पालकांचे वार्षिक उत्पन्न हे रू. 8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे, नुतनिकरणासाठी विद्यार्थ्यांने पूढील वर्शांत प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत 30 टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखुन ठेवण्यात येतील.

2. दिले जाणारे लाभ हे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रू 5000/– यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम.

**2. 3. शिवाजी विद्यापीठाकडून मिळणारी शिष्यवृत्ती**

**2. 3. 1. सर्वसाधारण गटातील गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज**

सदरची शिष्यवृत्ती फक्त गुणवत्तेच्या आधारे देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाची ( CSS , Minorities) राज्य शासनाची म्हणजेच महाडिबीटी पोर्टलवरील यापैकी कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे

1. मार्च/एप्रिल 2021 वार्षिक परीक्षेचे गुणपत्रक

2. आधारकार्ड व मतदान ओळखपत्र

3. विद्यार्थ्यांचे स्वतःचे राष्ट्रीयकृत बँकेचे आधार लिंक केलेले व सध्या चालू असलेल्या बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची सुस्पष्ट छायांकित प्रत

## 2. 3. 2. आर्थिक दुर्बल गटातील शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज

सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे देण्यात येणार आहे. शिष्यवृत्तीसाठी निवड करतांना गुणवत्तेला 70 टक्के महत्व असून कुटूंबातील संख्या, कौटूंबिक उत्पन्न दाखला इ. साठी 30 टक्के महत्व आहे. यासाठी तहसिलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला व रेशन कार्डची सत्यप्रत आवश्यक आहे. सदर शिष्यवृत्ती साठी फक्त खुल्या प्रवर्गातील व चालू शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही शिष्यवृत्तीसाठी अर्ज न केलेले विद्यार्थी पात्र ठरतात.

## 2. 3. 3. निराधार गटातील शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज

निराधार म्हणजे ज्या विद्यार्थ्यांचे आई/वडील हयात नसतील अशा विद्यार्थ्यांसाठी सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व कौटूंबिक परिस्थितीच्या निकषांच्या आधारे देण्यात येते, सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करतांना शैक्षणिक गुणवत्तेला 70 टक्के महत्व व 30 टक्के गुण इतर बाबीसाठी आहेत.

## 2. 3. 4. अंध, अपंग, व कर्णबधिर/मुकबधीर गटातील शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज

सदर शिष्यवृत्ती गुणवत्ता व शारिरीक विकलांगाच्या निकषांच्या आधारे देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करतांना विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेला 70 टक्के महत्व व शारिरीक विकलांगाच्या निकषासाठी 30 टक्के महत्व आहे. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

## 2. 3. 5. गुणवंत खेळाडू गटातील शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज

सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व खेळातील उल्लेखनीय कामगिरीच्या निकषाच्या आधारे देण्यात येते. शैक्षणिक गुणवत्तेला 70 टक्के महत्व व उर्वरीत 30 टक्के गुण खेळातील उल्लेखनीय कामगिरीसाठी आहेत. यासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे साक्षांकित करून जाडणे आवश्यक आहे.

## 2. 3. 6. शहीद सन्मान गटातील शिष्यवृत्तीसाठी नामांकन अर्ज

सदरची शिष्यवृत्ती शहीद लश्करी, निमलष्करी जवान व शहीद पोलीस विवाहीत असल्यास पती/पत्नी व पाल्यास आणि अविवाहीत असल्यास अविवाहीत सख्खा भाऊ व अविवाहीत सख्खी बहीण यांना गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

गृह मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचे कडून प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये शहीद लष्करी, निमलष्करी जवान व शहीद पोलीस यांचे नाव असणे आवश्यक आहे.

शहीद लष्करी, निमलष्करी जवान व शहीद पोलिस यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय/पोलीस कल्याण कक्ष व जनसंपर्क अधिकारी यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र अथवा शिफारसपत्र जोडणे आवश्यक आहे.

**2. 3. 7 बांधकाम कामगार शिष्यवृत्ती योजना**

जर तुमचे पालक नोंदणीकृत बांधकाम कामगार असतील तर तुम्हाला 5 हजार ते 10 हजार रूपये अनुदान स्कॉलरशिप म्हणून मिळू शकते.

आवश्यक कागदपत्रे :

1. ज्या विद्यार्थ्यांचा अर्ज सादर करणार आहात त्याच्या महाविद्यालयातील 75 टक्के असल्याचे उपस्थिती प्रमाणपत्र.
2. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
3. अर्जदाराचे आधार कार्ड
4. स्वयंघोषणापत्र
5. रेशन कार्ड अपलोड करावे.

अशा प्रकारे वरील माहितीच्या आधारे असे स्पष्ट होते की, शासनाने सामाजिक न्यायाच्या माध्यमातून समाजातील सामाजिक व आर्थिक मागास घटकांसाठी शिक्षणासाठी आर्थिक साहय योजना राबविल्या आहेत. याशिवाय अल्पसंख्यांक, अंध, अपंग, मुकबधीर, कर्णबधीर (दिव्यांग), गुणवंत, खेळाडू, स्वातंयसैनिक व माजी सैनिकांचे पाल्य, निराधार व बांधकाम कामगार ईत्यादी समाजघटकांसाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क सवलत योजना राबविल्या आहेत. एकूणच शासनाने समाजातील बहूतांश घटकांना उच्च शिक्षणात अंतर्भूत करण्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत. शासनाने पदवी स्तरावर विविध समाजघटकांना सामावुन घेणाऱ्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क सवलत योजना सुरू केल्या आहेत.

# प्रकरण तिसरे: लाभधारक व वंचित

**प्रस्तावना:**


प्रस्तूत प्रकरणात कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील शैक्षणिक वर्षे 2020–2021 व 2021–2022 यामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीच्या आधारे वर्षनिहाय लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची स्थिती तक्ते व आलेखांच्या स्वरूपात दर्शविली आहे. तथ्यांची मांडणी तुलनात्मक पध्दतीने करून त्याचे स्पष्टीकरण केले आहे.

तक्ता क्रमांक: 1 **वर्गवारीनिहाय शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची माहिती**

Academic Year 2020-21

| वर्गवारी | प्रवेशित विध्यार्थी | लाभधारक विध्यार्थी | % | वंचित विध्यार्थी | % |
|---|---|---|---|---|---|
| General | 225 | 57 | 25.3333 | 168 | 74.66667 |
| SC | 62 | 17 | 27.4194 | 45 | 72.58065 |
| ST | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| VJNT | 21 | 6 | 28.5714 | 15 | 71.42857 |
| OBC | 21 | 4 | 19.0476 | 17 | 80.95238 |
| SEBC | 1 | 0 | 0 | 1 | 100 |
| SBC | 4 | 1 | 25 | 3 | 75 |
| एकुण | 334 | 85 | 25.4491 | 249 | 74.5509 |

संदर्भ: **कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज**





**आलेख: 1**

तक्ता क्रमांक: 1 वर्गवारीनिहाय शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची माहिती

Academic Year 2021-22

| वर्गवारी | प्रवेशित विध्यार्थी | लाभधारक विध्यार्थी | % | वंचित विध्यार्थी | % |
|---|---|---|---|---|---|
| General | 272 | 50 | 18.3824 | 222 | 81.61765 |
| SC | 71 | 25 | 35.2113 | 46 | 64.78873 |
| ST | 1 | 0 | 0 | 1 | 100 |
| VJNT | 25 | 9 | 36 | 16 | 64 |
| OBC | 32 | 5 | 15.625 | 27 | 84.375 |
| SEBC | 2 | 2 | 100 | 0 | 0 |
| SBC | 3 | 0 | 0 | 3 | 100 |
| एकुण | 406 | 91 | 22.4138 | 315 | 77.58621 |
| | | | | | |

संदर्भ: कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज




आलेख: 2

**तक्ता व आलेख क्रमांक 1 च्या आधारे पुढील निरीक्षणे नोंदविले आहेत.**

1. शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. प्रवेशित विद्यार्थ्यापैकी केवळ 25.44 % विद्यार्थी लाभधारक आहेत. तर 74.55 टक्के विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत.

2. वर्गवारीनिहाय VJNT प्रवर्गातील विद्यार्थी इतर प्रवर्गाच्या तुलनेत 28.57 टक्के इतके सर्वाधिक लाभधारक आहेत. तर सर्वाधिक कमी SEBC प्रवर्गातील निरंक (विद्यार्थी संख्या केवळ 1) तर OBC प्रवर्गातील 19.04 टक्के लाभधारक आहेत.
3. वंचितांमध्ये सर्वाधिक वंचीत SEBC प्रवर्गातील 100 टक्के (विद्यार्थी संख्या केवळ 1) तर OBC प्रवर्गातील 80.95 टक्के विद्यार्थी आहेत.

**तक्ता व आलेख क्रमांक 2 च्या आधारे पुढील निरीक्षणे नोंदविले आहेत.**

1. शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. प्रवेशित विद्यार्थ्यापैकी केवळ 22.41 % विद्यार्थी लाभधारक आहेत. तर 77.58 टक्के विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत.
2. वर्गवारीनिहाय SEBC प्रवर्गातील विद्यार्थी इतर प्रवर्गाच्या तुलनेत 100 टक्के (विद्यार्थी संख्या केवळ 2) इतके सर्वाधिक लाभधारक आहेत. तर त्याखालोखाल 35.21 टक्के SC प्रवर्गातील लाभार्थी आहेत. सर्वाधिक कमी लाभार्थी ST व SBC प्रवर्गातील निरंक आहेत (विद्यार्थी संख्या केवळ अनूक्रमे 1 व 3). तर त्याखालोखाल OBC प्रवर्गातील 15.62 टक्के लाभधारक आहेत.
3. वंचितांमध्ये सर्वाधिक SBC प्रवर्गातील 100 टक्के (विद्यार्थी संख्या केवळ 1) त्याखालोखाल OBC प्रवर्गातील 84.37 त्याखालोखाल खुल्या प्रवर्गातील 81.61 टक्के विद्यार्थी वंचीत राहिले आहेत.

**तक्ता व आलेख क्रमांक 1 व 2 च्या आधारे पुढील निरीक्षणे नोंदविले आहेत.**


1. दोन्ही वर्षात शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.
2. 2020–21 वर्षाच्या तुलनेत 2021–22 वर्षात लाभधारकांची संख्या घटली असून वंचितांचे प्रमाण 3. 03 टक्क्यांनी वाढले आहे.
3. दोन्ही वर्षात सर्वाधिक OBC या प्रवर्गातील सरासरी 83. 01 विद्यार्थी लाभापासून वंचीत राहिले आहेत.


वरील सर्व निरीक्षणाअंती असा निष्कर्श निघाला आहे की, योजनांच्या लाभधारकांच्या तुलनेत वंचित राहणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

# प्रकरण चौथे: वंचिततेची कारणे व मिमांसा

**प्रस्तावना:**


प्रस्तूत प्रकरणात कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील शैक्षणिक वर्षे 2021—2022 यामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचा 12 ते 16 जून 2023 दरम्यान ऑनलाईन सर्वे घेण्यात आला. यामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सरासरी 31.52 टक्के विद्यार्थ्यांनी आपला अभिप्राय नोंदविला. प्रश्नावलीमध्ये 10 प्रश्न बंदिस्त तर 2 प्रश्न खुल्या पध्दतीने विचारले होत. यामध्ये लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची स्थिती, लाभापासून वंचीत राहण्याची कारणे व लाभाची व्यापकता वाढावी यासाठीचे उपाय याविषयी विद्यार्थ्यांचे अनुभवाधारील मते जाणून घेण्यात आली. तक्ते व आलेखांच्या स्वरूपात दर्शविली आहे. तथ्यांची मांडणी तुलनात्मक पध्दतीने करून त्याचे स्पष्टीकरण केले आहे.




जिल्हा

128 responses





तालुका

128 responses





लिंग

128 responses




धर्म

128 responses





आपला प्रवर्ग

128 responses





आपण मागील वर्षी (2021-22) मध्ये कोणत्या वर्गात शिकत होता?

128 responses



आपण मागील वर्षी (2021-22) खालीलपैकी कोणता लाभ घेतला आहे?

128 responses




आपण मागील वर्षी (2021-22) वरीलपैकी कोणताही लाभ घेतला नाही कारण?

128 responses




**सर्व उत्तरदात्याच्या अभिप्रायांच्या आधारे पुढील तथ्य निदर्शनास आले आहेत.**

सर्व उत्तरदाते कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात 2021–22 मध्ये प्रवेशित विद्यार्थी आहेत. यामध्ये 97.7 टक्के विद्यार्थी महाराष्ट्रातील व उर्वरीत कर्नाटक राज्यातील आहेत. उत्तरदात्यांमध्ये 95 टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी कोल्हापूर जिल्हयातील तर सर्वाधिक 68.8 टक्के गडहिंग्लज तालुक्यातील आहेत. उत्तरदात्यांमध्ये स्त्री व पुरूष यांचे सरासरी प्रमाण जवळजवळ समान आहे. धार्मिकदृष्टया सर्वाधिक 89.8 टक्के हिंदू त्याखालोखाल मुस्लिम व बौध्द उत्तरदाते आहेत. प्रवर्गनिहाय सर्वाधिक खुल्या प्रवर्गातील 64.8 टक्के व त्याखालोखाल अनुक्रमे SC, OBC व NT यांनी आपले मत नोंदविले आहे. वर्गानूसार सर्वाधिक बी. ए. भाग 1 व बी. कॉम भाग 1 च्या विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदविले आहेत.

1. सुमारे 60.9 टक्के विद्यार्थ्यांनी कोणतीही शिष्यवृत्ती वा शिक्षण शुल्क योजनेचा लाभ घेतला नाही.

2. केवळ 19.5 टक्के विद्यार्थ्यांनी शासकीय शिष्यवृत्तींची तर केवळ 13.3 विद्यार्थ्यानी शिक्षण शुल्क सवलत योजनेचा लाभ घेतला आहे.
3. जातीचा दाखला किंवा उत्पनाचा दाखला काढला नाही म्हणून वंचीत राहिलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 20 टक्के आहे. याशिवाय 13 टक्के विद्यार्थ्यानी जातीचा किंवा उत्पनाचा दाखला असूनही लाभासाठी अर्ज केला नाही.
4. जातीचा किंवा उत्पनाचा दाखला मिळत नाही असे 17 टक्के विद्यार्थी आहेत.
5. योजनांची माहिती नसणारे विद्यार्थी केवळ 3.5 टक्के आहेत.
6. आर्थिक उत्पन्न अधिक असणारे केवळ 1.5 टक्के विद्यार्थी आहेत.
7. 44 टक्के विद्यार्थ्यानी इतर कारणे असल्याचे म्हटले आहे. इतर कारणे विद्यार्थ्यानी स्वतंत्रपणे नोंद केले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्रं** | **वंचीतेचे कारण** |
|---|---|
| 1 | आधार कार्ड बॅंक खात्याला लिंक झालेले नाही |
| 2 | कागदपत्रे खुप जोडावे लागतात |
| 3 | सर्वर डाउन असणे |
| 4 | दाखले लवकर मिळत नाहीत |
| 5 | कर्नाटक राज्यातील रहिवाशी असल्याने |
| 6 | जतीचा दाखला काढताना 1960 पुर्वीचे पुरावे मागीतले जातात ते मिळत नाहीत |
| 7 | लाभप्राप्तीची प्रक्रिया अवघड आहे |

**सर्व तथ्यांच्या आधारे पुढील निरीक्षणे नोंदविले आहेत.**

1. शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.
2. जातीचा दाखला किंवा उत्पनाचा दाखला काढला नाही किंवा जातीचा किंवा उत्पनाचा दाखला असूनही लाभासाठी अर्ज केला नाही असे 33 टक्के विद्यार्थी आहेत की जे दाखले मिळत नाही असे म्हणणाऱ्यापेक्षा अधिक आहेत. अर्थात विद्यार्थ्यानी लाभासाठी अनुत्सूक असणे व दुर्लक्ष करणे हे वंचीत राहण्याचे एक कारण आहे.
3. योजनाची माहिती 96.5 टक्के विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली आहे. अर्थात जागृतीचे कार्य प्रभावीपणे झाले आहे.

4. अर्ज करण्याची क्लिष्ट प्रक्रिया, कागदपत्रे वेळेत न मिळणे, सर्वर डाउन असणे, जातीचे दाखल्यासाठी खुप जुने पुरावे न मिळणे हे देखील योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची प्रमुख कारणे आहेत.

स्टूडेंन्ट हेल्पिंग हॅन्डचे अध्यक्ष कुलदिप आंबेकर यांनी शासनाकडे पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीच्या लाभधारक व निधीबाबत माहिती मागविली होती यामध्येही असा निश्कर्ष समोर आला आहे की, मागील 10 वर्षात निधी व लाभधारकांच्या संखेत वाढ झाली नाही. कारोणाच्या काळात लाभधारकांच्या संखेत घट झाल्याचेही निदर्शनास आले आहे. तांत्रिक व प्रशासकीय अडचणीमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. (पहा. संदर्भ, 6)

# प्रकरण पाचवे: निष्कर्ष व उपाययोजना

**निश्कर्ष:**

वरील सर्व तथ्यांच्या व विश्लेषणाच्या आधारे पुढील निश्कर्ष निदर्शनास आले आहेत.

1. शासनाने सामाजिक न्यायाच्या माध्यमातून समाजातील सामाजिक व आर्थिक मागास घटकांसाठी शिक्षणासाठी आर्थिक साहय योजना राबविल्या आहेत.
2. अल्पसंख्यांक, अंध, अपंग, मुकबधीर, कर्णबधीर (दिव्यांग), गुणवंत, खेळाडू, स्वातंयसैनिक व माजी सैनिकांचे पाल्य, निराधार व बांधकाम कामगार ईत्यादी समाजघटकांसाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क सवलत योजना राबविल्या आहेत. एकूणच शासनाने समाजातील बहूतांश घटकांना उच्च शिक्षणात अंतर्भूत करण्यासाठी विविध समाजघटकांना सामावुन घेणाऱ्या पदवी स्तरीय शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क सवलत योजना सुरू केल्या आहेत.
3. शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क सवलत योजनांचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत व वंचीत राहिलेल्या विध्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.
4. 2020–21 वर्षाच्या तुलनेत 2021–22 वर्षात लाभधारकांची संख्या घटली असून वंचितांचे प्रमाण 3.03 टक्क्यांनी वाढले आहे.
5. 2020–21 व 2021–22 या दोन्ही वर्षात OBC या प्रवर्गातील सर्वाधिक सरासरी 83.01 विद्यार्थी लाभापासून वंचीत राहिले आहेत.
6. जातीचा दाखला किंवा उत्पनाचा दाखला काढला नाही किंवा जातीचा किंवा उत्पनाचा दाखला असूनही लाभासाठी अर्ज केला नाही असे 33 टक्के विद्यार्थी आहेत की जे दाखले मिळत नाही असे म्हणणाऱ्यापेक्षा अधिक आहेत. अर्थात विद्यार्थ्यानी लाभासाठी अनुत्सूक असणे व दुर्लक्ष करणे हे वंचीत राहण्याचे प्रमुख कारण आहे.
7. योजनाची माहिती 98.5 टक्के विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली आहे. अर्थात जागृतीचे कार्य प्रभावीपणे झाले आहे.
8. अर्ज करण्याची क्लिष्ट प्रक्रिया, कागदपत्रे वेळेत न मिळणे, सर्वर डाउन असणे, जातीचे दाखल्यासाठी खुप जुने पुरावे न मिळणे हे देखील योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची प्रमुख कारणे आहेत.
9. इतर कारणांमध्ये 2020–2021 वर्षात अनुदानित 120 विद्यार्थी संख्येच्या पुढील प्रवेशित 23 विद्यार्थी तर 2021–2022 वर्षात असेच 21 विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. या शिवाय गडहिंग्लज, चंदगड हा भाग सीमाभाग असल्याने कर्नाटक राज्यातील रहिवाशी परंतू

महाराष्ट्रात प्रवेशित असणारे विद्यार्थी देखील लाभापासून वंचित राहिले आहेत. (सीमाभागात राहणारे अनेक विद्यार्थी मराठी भाषिक आहेत व त्यांना महाराष्ट्र राज्यात शिक्षण घेणे सुलभ पडते).

वरील तथ्य व विश्लेषणाच्या आधारे संशोधनासाठी स्वीकारलेली गृहितके सिध्द झाली आहेत.

**उपाययोनजा अथवा शिफारशीः**

योजनांचा लाभातील अडचणी दूर करण्यासाठी सुचविलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

1. आवश्यक कागदपत्रे वेळेत, कमी खर्चात मिळण्याची सोय करावी. याबाबत विद्यार्थ्याचे अर्ज महाविद्यालयात जमा करून घावेत. एक गठठा ते शासकीस कार्यालयात जमा करावेत व शासकीय कार्यालयाने विशिष्ट वेळेत ती सर्व कागदपत्रे एक गठठा महाविद्यालयात जमा करावेत. येणे करून विद्यार्थ्याला ती ठराविक वेळेत महाविद्यालयात उपलब्ध होतील.
2. कमीत कमी व अत्यावश्यक कागदपत्रे असावीत. पाच हजार रूपये पेक्षा कमी शिक्षण शुल्क सवलत लागू असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी तलाठी पातळीवरील उत्पनाचा दाखला गृहित धरण्यात यावा.
3. सर्वर डाउन असण्याची समस्या अनेक वेळेला विद्यार्थ्याला अनुभवास येते. त्यामुळे त्यातील तांत्रिक सुधारणा कराव्यात.
4. विद्यार्थ्याला स्वत ऑनलाईन अर्ज करण्याची सोय असली तरी ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना असे ज्ञान अपुरे असते. त्यामुळे नेट कॅफे मध्ये जाउन अर्ज करावा लागतो. तेथे मनमानी पध्दतीने अर्ज भरण्याचे शुल्क आकारले जातात. यावर कसलेही नियंत्रण नसते. ही 1000 रूपयांपेक्षा कमी लाभ मिळणाऱ्या विद्यार्थ्याला खर्चिक व त्रासदायक वाटते परीणामी तो या प्रक्रियेतून बाहेर जाणे पसंत करतो व लाभापासून वंचित राहतो. म्हणून यात दुरूस्ती व्हावीण याबाबत महाविद्यालय पातळीवर एक खिडकी योजना राबवावी. प्रत्येक विद्यार्थ्याचा महाविद्यालयात अर्ज भरून घ्यावा.
5. कागदपत्रांची संख्या कमी करावी.
6. कागदपत्रे मिळविण्यातील अडचणी कमी कराव्यात. विशेषत जातीचे दाखले मिळण्यामध्ये अनेक अडचणी असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. याबाबत सिमाभागात सर्वे केला जावा. त्यातील कागदपत्राचे पुरावे मिळणेबाबत अनेक अडचणी आहेत त्या समोर येतील. त्या दुर करून सामाजिक मागासांना दाखला मिळण्यातील अडचणी दुर करण्यास उपाय काढता येईल.
7. पहिल्या वर्षी भरलेला अर्ज पुढे शिक्षण पुर्ण होईपर्यत तोच मान्य करावा.
8. अनुदानित तुकडीच्या 120 विद्यार्थी संख्येनंतर प्रवेशित होणारे विद्यार्थी आहेत. या अतिरिक्त प्रवेशासाठी विद्यापिठ मंजूरी देते. अशा अनेक विद्यार्थ्याना शिक्षण सवलत योजनेपासून वंचित रहावे लागते. अशा विद्यार्थ्यानाही लाभ मिळण्याची सोय करावी.

9. कर्नाटक–महाराष्ट्र सीमाभागातील अनेक मराठी भाषिक विद्यार्थी कर्नाटक रहिवाशी आहेत म्हणून त्यांना लाभापासून वंचित रहावे लागते. अशा विद्यार्थ्यासाठी महाराष्ट्र शासनाने लाभ देण्याची सोय करावी.

भविष्यात अभ्यासास वावः

हे संशोधन केवळ एका महाविद्यालयाच्या दोन वर्षातील तथ्यावर आधारलेले आहे. या पुढे अनेक महाविद्यालयाचा अभ्यास करता येईल. प्रस्तूत संशोधन पारंपारीक महाविद्यालयापुरते मर्यादित आहे. याशिवाय व्यावसाईक महाविद्यालयांचा अभ्यास करता येईल. अभ्यासाचा कालावधी वाढवून संशोधन करता येईल. प्रस्तूत संशोधन केवळ पदवी स्तरावरील असून प्राथमिक, माध्यमिक उच्च माघ्यमिक स्तरावर संशोधन करण्यास वाव आहे. याशिवाय परदेशी शिक्षणासाठी असलेल्या योजनांचा अभ्यास करता येईल.

## संदर्भ सूचीः


1. सर्वेक्षण प्रश्नावली– https://docs.google.com/forms/d/1Wks9dcPGN-3cXir9d_tlZemKNqUaqUO04O445M1dyMs/edit#responses , 17/6/2023
2. https://docs.google.com/spreadsheets/d/1H9BCEi-cd1bYNR3xUL5fySo9UYGbcHG761feYAfHxUw/edit?resourcekey#gid=2129464817 17/6/2023
3. https://mahadbt.maharashtra.gov.in/login/login , 3/6/2023
4. https://nsp.gov.in/ 3/6/2023
5. https://dbtbharat.gov.in/central-scheme/list , 5/6/2023
6. https://www.maxmaharashtra.com/max-reports/sc-st-student-scholarships-affected-due-to-covid-pandemic-in-maharashtra-849743?infinitescroll=1 19/6/2023
7. PPT made by Mahesh Chougule, Junior clark, Venkatesh Mahavidyalaya, Ichalkaranji
8. Peters, Guy B. (2013). *STRATEGIES FOR COMPARATIVVE RESEARCH IN POLITICAL SCIENCE.* UK, Palgrave Macmillan Publishers Limited
9. Educational Consultants India Ltd. (2005/2021 reprint*). Compendium on Scholarships Fellowships freeships and Educational Loans For study in India and Abroad*. India, National Book Turst
10. Pandya Rameshwari. (2013). Social Justice and Empowerment of Disadvantaged Groups in India. New Delhi, New Centuary Publications

अनुसूची: १

# सर्वेक्षण प्रश्नावली नमुना

अनुसूची: २

# शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१

# मधील

# लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची यादी

अनुसूची: ३

# शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२

# मधील

# लाभधारक व वंचित विद्यार्थ्यांची यादी